राज्यातील आणि राज्याबाहेरील पुरवठादार
व उद्योजकाकडून वस्तू खरेदी करताना
अवलंबावयाची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन,
शासन निर्णय क्रमांकः भांखस-१०९९/प्र.क्र.२८५६/उद्योग-६,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांकः ८ फेब्रुवारी,२०००

वाचा:-
१) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६, दि.२ जानेवारी, १९९२.
२) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-१०९३/(२६४३)/उद्योग-६, दि.१/६/१९९३
३) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-१०९३/(२६५१)/उद्योग-६,दि.२२/२/१९९४

प्रस्तावना:-

शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६, दि.२ जानेवारी, १९९२ नुसार शासकीय विभागाने तसेच निमशासकीय विभागाने त्याचप्रमाणे राज्य शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे इत्यादींनी भांडार खरेदी करताना कोणत्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा याबाबतचे आदेश देण्यात आलेले आहेत. हा निर्णय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित केलेला आहे. राज्यातील पुरवठादार/ उद्योजक तसेच, राज्याबाहेरील पुरवठादार/उद्योजक यांच्याकडून निविदा प्राप्त झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीचा उल्लेख परिच्छेद-९(ग) आणि परिशिष्ट-९ मध्ये करण्यात आलेला आहे. शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांकः भांखस-१०९३/ (२६५१) / उद्योग-६, दि.२२ फेब्रुवारी,१९९४ अन्वये परिच्छेद-९ (ग) व त्या अनुषंगाने विहित केलेल्या परिशिष्ट-९ मध्ये राज्यातील पुरवठादार व उद्योजक हे शब्दप्रयोग वापरताना जे वेगवेगळे अर्थ/विकार व कलेम तयार केले जात होते, त्याबाबतचाही सविस्तर खुलासा उपरोक्त शासन निर्णयात करण्यात आलेला आहे. तथापि, २२ फेब्रुवारी, १९९४ च्या शासन निर्णयातील स्पष्टीकरण व खुलासा हा फक्त समांतर दरकरार करण्यापुरताच लागू आहे आणि अन्य शासकीय खरेदीबाबत लागू नाही अशी धारणा काही शासकीय विभाग, कार्यालये/ उपक्रम/ महामंडळे यांची झालेली आहे आणि म्हणून हे विभाग

किंवा महामंडळे जेव्हा निविदा काढून सरळ वस्तु खरेदी करतात तेव्हा परिशिष्ट-९ मध्ये सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील पुरवठादारांच्या किंमती मधील साधर्म्य लक्षात घेत नाहीत. विभागांची ही धारणा चुकीची आहे. कारण समांतर दरकरार हा फक्त महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्याबरोबर होऊ शकतो, आणि या संस्था फक्त महाराष्ट्रातील पुरवठादाराकडूनच शासनाला वस्तुंचा पुरवठा करु शकतात. म्हणून याबाबतीत महाराष्ट्राबाहेरील पुरवठादारांच्या किंमतीबाबत प्रश्नच उद्भवत नाही. दुसरे म्हणजे समांतर दरकरार हा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या परिच्छेद-६ मध्ये निर्धारित केलेल्या वस्तुंच्या करण्यात येणा-या (म्हणजेच परिशिष्ट-४ मध्ये उदधृत केलेल्या वस्तु करताच) दरकराराशी संबंधित आहे आणि दरकरार अस्तित्वात असताना त्या व्यतिरिक्त निविदा मागवून वस्तूंची खरेदी करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. म्हणजेच ९ (ग) मधील या तरतुदी शासकीय विभाग, निमशासकीय कार्यालये/ उपक्रम/ महामंडळे इत्यादिंना मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने केलेल्या दरकरार अथवा समांतर दरकरारा व्यतिरिक्त वस्तुंची सरळ खरेदी करताना राज्यातील व राज्याबाहेरील पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या किंमतीमध्ये साधर्म्य काढून तुलना करण्याबाबतीत लागू आहे. या परिस्थितीमुळे दि.२/१/९२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-९ आणि त्या मधील ९(ग) या तरतुदीबाबत त्याचप्रमाणे दि.२२/२/१९९४ रोजी निर्गमित केलेल्या निर्णयाबाबत पुन्हा स्पष्टता आणण्यासाठी वरील बाब स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे.त्याप्रमाणे खाली नमूद केल्याप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

प्रस्तावनेमध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे आदेश काढण्यात येत आहेत.

(१) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६, दि.२ जानेवारी, १९९२मधील परिच्छेद-९(ग) हा रद्द करण्यात येत आहे.

(२) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६, दि.२ जानेवारी, १९९२मधील परिच्छेद ९ (ग) हा रद्द करण्यात आलेला असल्यामुळे राज्यातील आणि राज्याबाहेरील पुरवठादार व उद्योजकाकडून वस्तू खरेदी करताना अवलंबावयाची कार्यपध्दती, खाली दिल्याप्रमाणे नवीन परिच्छेद क्रमांक - ९.१ प्रमाणे राहील.

"९.१ :- राज्यातील आणि राज्याबाहेरील पुरवठादार व उद्योजकाकडून वस्तू खरेदी करताना अवलंबावयाची कार्यपध्दती"

ज्यावेळी राज्याबाहेरील पुरवठादारांनी व राज्यातील पुरवठादारानी एखाद्या निविदेमध्ये एकत्र भाग घेतला असेल अशावेळी परिशिष्ट 'नऊ'येथे दर्शविल्याप्रमाणे सूत्र वापरुन प्रथम किंमतीतील साधर्म्य ठरविण्यात यावे. या सुत्रात 'द' म्हणजे विक्रीकराचा दर असे नमूद

...ण्यात आले आहे. आता 'द' चा अर्थ मूळ विक्रीकर दर अधिक उलाढाल कर अधिक अतिरिक्त कर ( मूळ विक्रीकरावर लावण्यात येणारा कर ) असा समजण्यात यावा. त्यानंतर ... एखाद्या निविदेत राज्याबाहेरील पुरवठादाराचा दर हा कमीत कमी नान्यताप्राप्त दर ठरलो असेल तर अशावेळी राज्याबाहेरील पुरवठादारास ५० टक्के पुरवठा आदेश देण्यात यावेत आणि राज्यातील उद्योजकाला संधी मिळावी या दृष्टीकोनातून ५० टक्के पुरवठा आदेश देण्यात यावेत. मात्र जर राज्यातील उद्योजक सदर मागणी स्विकारण्यास तयार नसतील तर राज्याबाहेरील पुरवठादारास संपूर्ण मागणी देण्यात यावी. मागणी विभागून देण्याचे सर्वाधिकार संबंधित सामान खरेदी समितीस राहतील.

९.१.१. परिच्छेद-९.१ येथे नमूद केल्याप्रमाणे ज्यावेळी राज्याबाहेरील पुरवठादार व राज्यातील पुरवठादार (उद्योजक धरुन) यांनी निविदेमध्ये एकत्र भाग घेतले असतील अशा वेळी, सदर शासन निर्णयाच्या परिशिष्ट 'नऊ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे सूत्र वापरुन किंमतीतील साधर्म्य ठरवावयाचे आहे. परिशिष्ट 'नऊ' मधील सूत्रानुसार जर महाराष्ट्रातील पुरवठादारांचा (उद्योजक धरुन) दर निम्नतम आला तर राज्यातील पुरवठादाराला राज्यातील पुरवठादाराने नमूद केलेल्या दराने १०० टक्के पुरवठा आदेश देण्यात यावेत.

९.१.२. तुलना करताना, परिशिष्ट 'नऊ' मधील सूत्र वापरुनसुध्दा जर राज्याबाहेरील पुरवठादारांचा दर निम्नतम ठरला तर परिच्छेद ९.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, निम्नतम दर नमूद करणाऱ्या राज्याबाहेरील पुरवठादाराला ५० टक्के पुरवठा आदेश देण्यात यावेत. उर्वरित ५० टक्के पुरवठा आदेश निविदेत भाग घेणाऱ्या महाराष्ट्रातील उद्योजकाला, त्यांनी निम्नतम दराने समान दर्जाचा माल पुरविण्याची तयारी दर्शविली तर देण्यात यावेत.

९.१.३. महाराष्ट्रातील उद्योजकांपैकी कमी दराची निविदा भरणाऱ्या उद्योजकांची क्षमताच जर कमी असेल तर हे पुरवठा आदेश अशा उद्योजकांच्या उत्पादन क्षमतेएवढे सीमित राहतील.

९.१.४. राज्यातील उद्योजकांचा कमीत कमी दर एकापेक्षा अधिक उद्योजकांनी निविदेमध्ये सारखाच नमूद केलेला असेल तर अशावेळी पुरवठा आदेश समान भागामध्ये उद्योजकांचे क्षमतेचें अधीन राहून संबंधित उद्योजकांना विभागून द्यावेत.

९.१.५. वरील परिच्छेद ९.१.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यातील कमी दर

भरणाऱ्या उद्योजकाला त्यांच्या क्षमतेएवढे पुरवठा आदेश दिल्यानंतर जर काही मागणी शिल्लक राहिली तर त्यापेक्षा अधिक दर निविदेमध्ये नमूद करणाऱ्या महाराष्ट्रातील उद्योजकाचा क्रमशः विचार करण्यात यावा. त्यांनाही निम्नतम दराने समान दर्जाचा माल पुरविण्याची अट लागू राहील. अशारितीने राज्यातील उद्योजकांपैकी जर एखाद्या उद्योजकाने निम्नतम दराने समान दर्जाचा माल पुरवठा करण्यास लेखी नकार दिला तर वरील पध्दतीनुसार निविदेमध्ये अधिक दर नमूद करणाऱ्या महाराष्ट्रातील इतर उद्योजकांचा त्यांच्या क्षमतेनुसार क्रमशः विचार करण्यात यावा.

१.१.६. राज्यातील निविदाकारांचा दर जर निम्नतम येत नसेल तर ५० टक्के पुरवठा आदेशाचा फायदा निविदेस भाग घेणाऱ्या, राज्यातील उद्योजकांनाच द्यावयाचा आहे.

१.१.७. काही वेळा पुरवठादार महाराष्ट्रातील पत्ता दर्शवितात ते पुरवठा करताना महाराष्ट्राबाहेरील पुरवठादारांकडून माल घेतात व त्यामुळे ते महाराष्ट्रातील विक्रीकर न आकारता केंद्रीय विक्रीकर आकारतात. अशावेळी निविदाकारांनी केवळ पत्ता महाराष्ट्रातील दर्शविला म्हणून ते महाराष्ट्रातील निविदाकार होणार नाहीत. म्हणजे, जे निविदाकार महाराष्ट्रातील विक्रीकर भरत आहेत असेच निविदाकार हे महाराष्ट्रातील पुरवठादार किंवा उद्योजक संबोधले जातील.

१.१.८. परिशिष्ट "नऊ" मधील सूत्र वापरताना त्यामध्ये जो "विक्रीकर दर" गृहीत धरावयाचा आहे , तो शासकीय विभागांकडून खरेदी करताना वापरावयाच्या "एच" फॉर्मवर उपलब्ध होणारा सवलतीचा ४ टक्के दर होय.

१.१.९. काही वस्तूंच्या बाबतीत विक्रीकराचा "नोटीफाईड" दर हा "एच" फॉर्मवर उपलब्ध होणाऱ्या सवलतीच्या ४ टक्के दरापेक्षाही कमी असतो. अशावेळी सवलतीचा ४ टक्के दर न धरता परिशिष्ट "नऊ" मधील सूत्रासाठी, त्यापेक्षा कमी असलेला नोटीफाईड दर हिशेबात धरुन परिशिष्ट "नऊ" मधील गणित करावयाचे आहे.

१.१.१०. काही शासकीय,निमशासकीय कार्यालये काही वस्तूंसाठी "एच" फार्म देऊ शकत नाहीत व त्यामुळे त्यांना विक्रीकराचा सवलतीचा ४ टक्के दर उपलब्ध होत नाही.अशा वेळी निविदाकार सर्व समाविष्टित दर दर्शविताना,त्यामध्ये विक्रीकराचा भाग किती टक्के दराने अंतर्भूत केला आहे ते दर्शवितात. हा विक्रीकराचा भाग ४ टक्केपेक्षा अधिक असेल तर अशा वेळी महाराष्ट्रातील निविदाकारांनी (उद्योजकांसह) विक्रीकराचा जो

भाग दरम्यान अंतर्भूत केलेला असेल तो विक्रीकराचा भाग परिच्छेद "नक"मधील सूत्राचे गणित करताना वापरावा.

(३) दि. २/१/९२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-९ (ग) रद्द केल्यामुळे आणि नवीन परिच्छेद ९.१ नव्याने अंतर्भूत करण्यात आल्याने शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक- भांखस-१०९३/(२६४९)/उद्योग-६, दि. २२/२/१९९४ अस्तित्वात ठेवण्याची आवश्यकता नसल्याने सदरील शासन निर्णय तो रद्दबातल करण्यात येत आहे.

(४) दि. २.१.१९९२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद, ९ (ग) रद्द केल्यामुळे सदर निर्णयातील परिशिष्ट ९ च्या नावाखालील कंसात ' परिच्छेद ९ (ग) पहावा ' असे लिहिले आहे त्याऐवजी आता 'परिच्छेद ९.१ पहावा ' असे वाचण्यात यावे.

२. या आदेशाची अंमलबजावणी करणे सर्व शासकीय विभाग/निमशासकीय विभाग, शासनाचे उपक्रम, महामंडळे/ मंडळे इत्यादी सर्वांवर बंधनकारक आहे.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने आणि त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७४७/९९/व्यय-१६, दि. १७/१२/१९९९ व क्रमांक-२/२०००/करा-१, दि.१०/१/२००० अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आर. बा. कांबळे,
शासनाचे उप सचिव.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहाय्यक.
प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई/ नागपूर/ औरंगाबाद.
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई/ नागपूर/ औरंगाबाद
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई
प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी